# हिंगोली जिल्हा पोलीस वार्तापत्र

## पोलीस अधीक्षक कार्यालय,हिंगोली.

## दिनांक ०५.०९.२०२२

**अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणारे वाहन चालकावर कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयात दि ०४/०९/२०२२ रोजी अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या ०९ वाहन चालका विरूध्द कार्यवाही करण्यात आली असुन त्यांचे कडुन ५,५००/— रूपये दंड वसुल करण्यात आला आहे.

**दारूबंदी सदराखाली विशेष मोहित अंतर्गत कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये अवैध दारू विक्री अंतर्गत दि.०४/०९/२०२२ रोजी दारूबंदी कायदया अंतर्गत हिंगोली जिल्हयात एकुण ०३ ठिकाणी छापा मारूण कार्यवाही करून आरोपीतां कडुन १३.८६ लिटर दारू असा एकुण ५,३९०/—रू.कि.चा अवैध दारूसाठा जप्त करण्यात आला असुन आरोपीतां विरूध्द दारूबंदी कायदयाअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात येवुन पुढील तपास करण्यात येत आहे.

**अवैधरित्या शस्त्र बाळगणाऱ्या विरूध्द विशेष मोहिम :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये अवैधरित्या शस्त्र बाळगणाऱ्या विरूध्द विशेष मोहिम अंतर्गत दि.०४/०९/२०२२ रोजी भारतीय शस्त्र अधिनियम अंतर्गत हिंगोली जिल्हयात एकुण ०४ ठिकाणी छापा मारूण कार्यवाही करून आरोपीतां कडुन अवैध शस्त्र जप्त करण्यात आले असुन आरोपीतां विरूध्द भारतीय शस्त्र अधिनियम अन्वये गुन्हा दाखल करण्यात येवुन पुढील तपास करण्यात येत आहे.